# नागरिकांची सनद

## राज्य आरोग्य  हमी सोसायटी

जीवनदायी भवन, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार,
गणपत जाधव मार्ग,वरळी, मुंबई ४०० ०१८

दुरध्वनी क्रमांक- ०२२- ६५५४३९००/१०

Website:- www.jeevandayee.gov.in

# प्रस्तावना

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजना राज्यात सन २०१८ पासून एकत्रितपणे राबविण्यात येत आहेत. शासनाने या योजनांमधील तरतुदींचे विस्तारीकरण केले असून महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व नागरिकांसाठी लागू केली आहे. तसेच लाभार्थी कुटुंबांना वार्षिक रु.५ लक्ष पर्यंतचे आरोग्य संरक्षण अनुज्ञेय आहे. विस्तारीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना दि.१.०७.२०२४ पासून राज्यात राबविण्यात येत आहे.

या योजनेव्दारे निवडक तज्ञ सेवांमधील उपचारांसाठी अंगीकृत रुग्णालयांत दाखल होण्यापासून ते रुग्णालयातून सुट्टी होईपर्यंत रोख रक्कमरहीत दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिली जाते. ही योजना संपुर्णपणे हमी तत्त्वावर राबविली जात आहेत. लाभार्थ्यांनी योजनेच्या अंगीकृत रुग्णालयात मोफत लाभ घ्यावयाचा असून त्यापोटी होणाऱ्या खर्चाचे दावे राज्य आरोग्य हमी सोसायटीव्दारे अंगीकृत रुग्णालयांना प्रदान केले जात आहेत.

एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांची सर्व सामान्य नागरिकांना माहिती प्राप्त व्हावी याकरिता राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत नागरिकांची सनद प्रसिध्द करण्यात येत आहे. ही नागरिकांची सनद सर्व सामान्य नागरिकांसाठी नेहमीच खुली असेल आणि सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा विचार करुन या सनदेमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात येतील. राज्य आरोग्य हमी सोसायटी नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास नेहमी कटीबध्द आहे.

आण्णासाहेब चव्हाण, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
राज्य आरोग्य हमी सोसायटी

# राज्य आरोग्य हमी सोसायटी

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखाली राज्य आरोग्य हमी सोसायटी कार्यरत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्र.मफुयो-२०१६/प्र.क्र.३३१/आरोग्य-६, दि.१२ ऑगस्ट,२०१६ अन्वये सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट,१८६० (१६८० चा अधिनियम क्र.२१) च्या तरतुदीनुसार, 'राज्य आरोग्य हमी सोसायटी' स्थापन करण्यास व सदर अधिनियमातील तरतुदीनुसार पंजीबध्द करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्देशानुसार, **'राज्य आरोग्य हमी सोसायटी'** पंजीबध्द करण्यात आली आहे.

राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत एकत्रित आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राबविली जात आहे.

**राज्य आरोग्य हमी सोसायटीची रचना** – सदर सोसायटीचे राज्य आरोग्य हमी सोसायटीचे दैनंदिन प्रशासकीय कामकाज तसेच अधिपत्याखालील योजनांचे नियंत्रण व नियमन मुख्य कार्यकारी अधिकारी पाहतात. मुख्य कार्यकारी अधिकारी हे अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आहेत. त्यांना सहाय्य करण्याकरिता मुख्यालय स्तरावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्तीय सल्लागार व सहाय्यक संचालक (आरोग्य सेवा) हे प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी तसेच अन्य कंत्राटी अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर क्षेत्रीय व्यवस्थापक व जिल्हा स्तरावर जिल्हा समन्वयक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना – सर्वसाधारण माहिती

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यात दि.२ जुलै २०१२ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. ही राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून सुरुवातीला कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी सुरू करण्यात आली आणि नंतर वेळोवेळी इतर लाभार्थी गट त्यामध्ये समाविष्ट करण्यात आले.

आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना दि.२३ सप्टेंबर,२०१८ पासून भारत सरकारव्दारे लागू करण्यात आली. या योजनेकरिता येणाऱ्या खर्चाची विभागणी भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये ६०:४० च्या प्रमाणात आहे. ही योजना राज्याच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसोबत एकत्रितपणे राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.२८ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील सर्व कुटुंबांसाठी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आणि चालू योजनेची व्याप्ती वाढवली. त्यानुसार दि.१ जुलै २०२४ पासून विस्तारित कार्यक्षेत्रासह एकात्मिक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत महाराष्ट्रातील सर्व लोकसंख्या समाविष्ट आहे. ही योजना अंगीकृत रुग्णालयांद्वारे रुग्णालयात दाखल होणे आवश्यक असलेल्या व्दितीय आणि तृतीय प्रकारच्या आजारांसाठी रुग्णालयात दाखल होण्यापासून ते घरी सुट्टी होईपर्यंत रोखरहित दर्जेदार वैद्यकीय सेवा प्रदान करते. ही योजना पूर्णपणे हमी तत्त्वावर राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून राबविण्यात येत आहे.

**लाभार्थी:**

| आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (गट-अ) |
|---|
| ▪ सामाजिक, आर्थिक आणि जातनिहाय जनगणना, २०११ (SECC) मधील कुटुंबे (ओळख पटलेली)<br>▪ राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा (NFSA) मधील समाविष्ट अंत्योदय अन्न योजना (AAY) आणि प्राधान्य गटातील (PHH) निवडक कुटुंबे |

| महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना | |
|---|---|
| गट | लाभार्थ्यांचा तपशील |
| गट अ | पिवळी, केशरी, अंत्योदय अन्न योजना व अन्नपुर्णा शिधापत्रिकाधारक कुटुंबे |
| गट ब | • शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबे<br>• कोणत्याही प्रकारची शिधापत्रिका नसलेली परंतु महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्रधारक असलेली कुटुंबे |
| गट क | ▪ शासकीय/शासनमान्य अनाथाश्रमातील मुले,<br>▪ शासकीय/शासनमान्य आश्रमशाळेतील विद्यार्थी,<br>▪ शासकीय/शासनमान्य महिला आश्रमातील महिला,<br>▪ शासकीय/शासनमान्य वृध्दाश्रमातील जेष्ठ नागरिक<br>▪ माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकार व त्यांचेवर अवलंबित असलेले कुटुंबातील सदस्य.<br>▪ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणी जिवित बांधकाम कामगार व त्यांची कुटुंबे (महाराष्ट्र राज्यातील बाहेरील रहीवासी असलेले) |
| गट ड | महाराष्ट्रातील कोणत्याही रस्त्यावर अपघातग्रस्त झालेला महाराष्ट्र/भारताबाहेरील रुग्ण |
| गट इ | महाराष्ट्र- कर्नाटक सीमेवरील बेळगाव, कारवार, कलबुर्गी आणि बिदर जिल्ह्यांतील ८६५ गावांतील खाली नमूद केलेली शिधापत्रिकाधारक कुटुंबे<br>१) अंत्योदय अन्न योजना (AAY)<br>२) प्राधान्य गट (PHH)<br>३) अन्नपूर्णा योजना |

| रुग्णाच्या नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे | |
|---|---|
| प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (गट अ) | आयुष्मान कार्ड व व वैध फोटो ओळखपत्र |
| महात्मा फुले योजना (गट अ) | आयुष्मान कार्ड किंवा शिधापत्रिका (पिवळी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपुर्णा, केशरी) व वैध फोटो ओळखपत्र |
| महात्मा फुले योजना (गट ब) | • आयुष्मान कार्ड किंवा शुभ्र शिधापत्रिका.<br>• शुभ्र शिधापत्रिका नसल्यास, स्वयं-घोषणापत्रासह अधिवास प्रमाणपत्र किंवा तहसीलदार प्रमाणपत्र आणि वैध फोटो ओळखपत्र<br>• शासकीय/निमशासकीय कर्मचारी असल्यास, स्वयं-घोषणापत्रासह शुभ्र शिधापत्रिका आणि वैध फोटो ओळखपत्र |
| महात्मा फुले योजना (गट क) | आयुष्मान कार्ड किंवा संबंधित संस्थेने निर्गमित केलेले वैध ओळखपत्र आणि वैध फोटो ओळखपत्र |
| महात्मा फुले योजना (गट ड) | अपघातग्रस्त व्यक्तीचा रुग्णालयातील जिओ टॅगींग फोटो, रस्ते अपघात झाल्याचे रुग्णालयाने पोलीसांना कळविल्याचे पत्र तसेच रुग्णाचा आधार कार्ड किंवा मतदार कार्ड किंवा पॅन कार्ड किंवा पासपोर्ट यापैकी कोणतेही फोटो ओळखपत्र |
| महात्मा फुले योजना | कर्नाटक शासनातील समक्ष प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेली अंत्योदय अन्न योजना |

| | |
|---|---|
| (गट इ) | (AAY) शिधापत्रिका, प्राधान्य गट (PHH) शिधापत्रिका, अन्नपूर्णा योजना शिधापत्रिका, विहीत नमुन्यातील स्वयं-घोषणापत्र आणि वैध फोटो ओळखपत्र |

**नोंदणीसाठी स्विकारण्यात येणाऱ्या वैध फोटो ओळखपत्रांची यादी:**

| | | | |
|---|---|---|---|
| पॅन कार्ड | वाहनचालक परवाना | मतदार ओळखपत्र | फोटोसह दिव्यांग प्रमाणपत्र |
| शाळा/कॉलेज ओळखपत्र | पासपोर्ट | स्वातंत्र्य सैनिक ओळखपत्र | |
| आधार कार्ड / लाभार्थ्याच्या फोटोसह आधार नोंदणीपत्र | | फोटोसह राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक | |
| केंद्र शासन/ राज्य शासनाने निर्गमित केलेले जेष्ठ नागरिक ओळखपत्र | | सैनिक कल्याण बोर्डाकडून वितरीत केलेले सैन्यदलातील माजी कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र | |
| सागरी मच्छिमार असल्याचे ओळखपत्र (कृषी/ मत्स्यव्यवसाय विभाग महाराष्ट्र शासन यांची वितरीत केलेले) | | राज्य शासन/ केंद्र शासनाने वितरीत केलेले अन्य कोणतेही ओळखपत्र | |
| टिप - ओळखपत्राचा पुरावा म्हणून आधार कार्डचा आग्रह धरण्यात येईल आणि आधार कार्ड/ क्रमांक उपलब्ध नसल्यास, आधार कार्ड तयार करण्यासाठी स्विकारण्यात येणाऱ्या कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र स्विकारण्यात येतील. | | | |

**लाभार्थी कुटुंब संख्या:** एकत्रित योजनेंतर्गत राज्यातील सुमारे २.७२ कोटी कुटुंबे (अंदाजे १२.५४ कोटी लोकसंख्या) समाविष्ट आहेत. तसेच कर्नाटक सीमा भागातील ४ जिल्हयांतील अंदाजे ८ लक्ष कुटुंबांचा देखील या योजनेत सहभाग आहे.

**वार्षिक आरोग्य संरक्षण -**

- ‘अ ते इ गट’ साठी (ड वगळून) - रु. ५ लाख प्रति कुटुंब प्रति वर्ष
- ‘ड गट’ करिता - रु.१ लाख प्रति व्यक्ती प्रति वर्ष.

**वैद्यकीय लाभ -**

- ‘अ ते इ गट’ साठी (ड वगळून) - ३४ विशेष सेवांतर्गत १३५६ आरोग्य उपचार पॅकेज
- ‘ड गट’ करिता - रस्ता अपघात रुग्णांसाठी १८४ आरोग्य उपचार पॅकेज

**शासकीय रुग्णालयांसाठी राखीव उपचार -** ११९ आरोग्य उपचार पॅकेज (‘अ ते इ गट’ साठी)

**शस्त्रक्रिया पश्चात पाठपुरावा सेवा -** २६२ आरोग्य उपचार पॅकेज (‘अ ते इ गट’ साठी)

**उपचारांचा समावेश:**

- एकत्रित योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांमध्ये निवडक ३४ विशेष सेवा प्रकारांतर्गत शस्त्रक्रिया व चिकित्सा यावरील नि:शुल्क उपचार.
- एकूण १३५६ शस्त्रक्रिया/चिकित्सा/उपचार

| अ.क्र. | विशेष सेवा प्रकार | अ.क्र. | विशेष सेवा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | भाजणे /जळीत (Burns) | १८ | मेंदू व मज्जातंतूच्या विकारावरील शस्त्रक्रिया (Neurosurgery) |
| २ | हृदयरोग (Cardiology) | १९ | स्त्री रोग व प्रसुती शास्त्र (Obstetrics and Gynecology) |
| ३ | हृदय व रक्तवाहिन्यासबंधी अणि छातीची शस्त्रक्रिया (Cardiovascular and Thoracic surgery) | २० | नेत्ररोग शस्त्रक्रिया (Ophthalmology) |
| ४ | आकस्मिक गंभीर आजार उपचार (Critical Care) | २१ | अस्थिव्यंग शस्त्रक्रिया (Orthopedics) |
| ५ | त्वचारोग (Dermatology) | २२ | बालरोग शस्त्रक्रिया (Paediatric Surgery) |
| ६ | अंत:स्त्राव संस्थेचे विकार (Endocrinology) | २३ | प्लास्टीक सर्जरी (Plastic Surgery) |
| ७ | कान, नाक व घसा रोग (ENT surgery) | २४ | पॉलिट्रॉमा (Polytrauma) |
| ८ | सर्वसाधारण औषधशास्त्र चिकित्सा (General Medicine) | २५ | कृत्रिम अवयव उपचार (Prosthesis and Orthosis) |
| ९ | सर्वसाधारण शस्त्रक्रिया (General Surgery) | २६ | फुफ्फुस आणि श्वसन प्रणाली उपचार (Pulmonology) |
| १० | रक्तविकार (Hematology) | २७ | विकिरण चिकित्सा उपचार (Radiation Oncology) |
| ११ | संसर्गजन्य आजार (Infectious diseases) | २८ | संधिवात सबंधी उपचार (Rheumatology) |
| १२ | इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी (Interventional Radiology) | २९ | सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी (Surgical Gastroenterology) |
| १३ | मेडीकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी (Medical Gastroenterology) | ३० | कर्करोगाच्या शस्त्रक्रिया (Surgical Oncology) |
| १४ | कर्करोगावरील औषधोपचार (Medical Oncology) | ३१ | मुत्ररोग चिकित्सा (Urology - Genitourinary Surgery) |
| १५ | नवजात व बालरोग वैद्यकीय चिकित्सा (Neonatal and Paediatric Medical Management) | ३२ | मनोविकार व मानसिक आजार (Mental disorders) |
| १६ | मुत्रपिंड व मुत्रमार्गाचे आजार (Nephrology) | ३३ | तोंड, जबडा व चेहऱ्याच्या अस्थींवरील शस्त्रक्रिया (Oral and Maxillofacial Surgery) |
| १७ | मेंदू व मज्जातंतूचे विकार (Neurology) | ३४ | रक्तासबंधी कर्करोग (Hematooncology) |

- शस्त्रक्रिया व उपचारांची यादी व त्यांचे पॅकेज दर - www.jeevandayee.gov.in >operational guidelines वर उपलब्ध.
- समाविष्ट सेवा :
  - सर्वसाधारण वॉर्डमधील खाटाचे शुल्क
  - परिचारिका शुल्क,
  - विशेषज्ञ, भूलतज्ञ व वैद्यकीय अधिकारी यांचे शुल्क

- तपासणी शुल्क, भुल, ऑक्सीजन, ऑपरेशन थिअटर व अतिदक्षता शुल्क
- शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या साहित्याची किंमत
- औषधे व द्रव्ये, कृत्रिम अवयवाची किंमत, रक्त संक्रमणाचे दर (राज्य शासनाच्या धोरणानुसार रक्त पुरविणे),
- इन्प्लॉट, एक्स-रे व निदान चाचण्या
- आंतररुग्णास भोजन, डिस्पोजेबल व कन्झुन्मेबल
- राज्य परिवहनाच्या दरानुसार किंवा रेल्वेच्या व्दितीय श्रेणी भाडे यानुसार वाहतुक खर्च (रुग्णालय ते रुग्णाचे निवासापर्यंत)
- उपचारादरम्यान काही गुंतागुंत झाल्यास त्यासह संपुर्ण खर्चाचा अंतर्भाव
- रुग्णाचा मृत्यू झाला तर रुग्णाचा मृतदेह रुग्णालयातून घरापर्यंत घेऊन जाण्याचा खर्च समाविष्ट.

## अंगीकृत रुग्णालये:

- अंगीकृत रुग्णालयांची कमाल संख्या - १९००
- सद्यस्थितीत अंगीकृत रुग्णालये - १७९२ (दि.१३.०१.२०२५ पर्यंत)
- शासकीय अंगीकृत रुग्णालये – ६४८
- खाजगी अंगीकृत रुग्णालये – ११४४
- रुग्णालयातील संबंधित व्यक्ती – आरोग्यमित्र
- अंगीकृत रुग्णालयांच्या अधिक माहितीसाठी - www.jeevandayee.gov.in > Network Hospitals
- अंगीकरणाकरिता - www.jeevandayee.gov.in > Hospitals>Hospital Empanelment Request

## योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व कालमर्यादा:

| अ.क्र. | सेवा | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | योजनेंतर्गत नाव नोंदणी | १ तास |
| २ | उपचार/शस्त्रक्रियेस पुर्वमान्यता | ६ तास |
| ३ | आपत्कालीन परिस्थितीत उपचारांकरिता पुर्वमान्यता | तात्काळ |
| ४ | योजनेसंदर्भात कॉल सेंटरव्दारे माहिती | तात्काळ |

उपरोक्त अ.क्र.१ ते ३ येथील सेवा पुर्णत: संगणक प्रणालीव्दारे ऑनलाईन दिल्या जातात. लाभार्थ्यांस स्वत: संगणक प्रणालीवर कोणताही अर्ज करावा लागत नाही. अंगीकृत रुग्णालयातील आरोग्यमित्र व वैद्यकीय समन्वय अधिकारी हे रुग्णाची नोंद करुन उपचार सुरु करतात.

### टोल फ्री कॉल सेंटर क्रमांक:

१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना - १५५ ३८८ अथवा १८०० २३३ २२००
२) आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य - १४५५५ अथवा १८०० १११ ५६५

## क्षेत्रीय कार्यान्वयन:

- क्षेत्रीय स्तरावर क्षेत्रीय व्यवस्थापक व प्रत्येक जिल्हयात जिल्हा समन्वयक कार्यरत.
- www.jeevandayee.gov.in >staff directory येथे संपर्क तपशील उपलब्ध.

**अंमलबजावणी सहाय्य संस्था:**

योजनेच्या अंमलबजावणीसाठी व संगणक प्रणालीवर प्राप्त प्रकरणांची तपासणी करणेकरिता निविदा प्रक्रियेव्दारे तीन अंमलबजावणी सहाय्य संस्थांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये १) मे. एमडीइंडिया हेल्थ इन्श्युरन्स् टिपीए प्रा.लि., २) मे. पॅरामाऊंट हेल्थ सर्व्हीसेस ॲण्ड इन्श्युरन्स प्रा. लि. व ३) मे. मेडी असिस्ट इन्श्युरन्स टिपीए प्रा.लि. या संस्थांचा समावेश आहे. सदर तीन संस्थामध्ये राज्यातील जिल्हयांचे कार्यक्षेत्र वितरीत करण्यात आले असून सदर संस्था त्यांना नियुक्त जिल्हयांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार आहेत.

| अंमलबजावणी सहाय्य संस्थेचे नाव | वितरीत जिल्हे |
|---|---|
| **एमडीइंडिया हेल्थ इन्श्युरन्स टिपीए प्रा.लि.** | **महाराष्ट्र -** ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, नंदुरबार, अहिल्यानगर, सातारा, जालना, परभणी, बीड, नांदेड, धाराशीव, लातूर, वाशिम, नागपूर, गोंदीया, गडचिरोली (२१)<br>**महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भाग** – कारवार (१) |
| **मेडीअसिस्ट इन्श्युरन्स् टिपीए प्रा.लि.** | **महाराष्ट्र-** मुंबई, जळगांव, छ. संभाजी नगर, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, भंडारा, चंद्रपुर (८) **महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भाग -** कलबुर्गी, बेलगावी, बिदर (३) |
| **पॅरामाऊट हेल्थ सर्व्हीसेस ॲण्ड इन्श्युरन्स प्रा.लि.** | **महाराष्ट्र-** धुळे, पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, हिंगोली (६) |

-------------------------------